महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रोपनिर्मितीचा व्यापक कार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे.

नागपूर येथील विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन, २०१५ च्या दरम्यान दिनांक ०९ डिसेंबर, २०१५ रोजी महात्मा गांधी नरेगा योजनेअंतर्गत वन विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या कामांमध्ये वाढ व्हावी याकरिता सचिव (रोहयो), सचिव (वने), प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन आणि रोहयो विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी झालेल्या चर्चेत वन विभागाकडील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योजनेची अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणी मांडल्या. यावेळी देखील सामाजिक वनीकरण व वन विभाग यांना महात्मा गांधी नरेगाअंतर्गत कामे करताना प्रशासकीय मंजूरी व हजेरीपत्रके निर्गमित करणे, इ. बाबींसंदर्भात अधिक व्यापक अधिकार देण्याचे प्रतिपादन करण्यात आले.

मा. मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८ व ०९ जुलै, २०१६ रोजी यशदा, पुणे येथे झालेल्या बैठकीत महात्मा गांधी नरेगा अंतर्गत कामे करताना वन विभागास येणाऱ्या अडीचणीं बाबत वन विभाग व रोजगार हमी योजना विभागाशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची सविस्तर चर्चा झाली. वन विभागाकडून प्रस्तावित असलेला वृक्षलागवडीचा कार्यक्रम तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वनविभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांच्या कार्यप्रणालीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे.

वन विभागामार्फत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांना संदर्भ क्र. २ येथील दिनांक ०३ ऑगस्ट, २०११ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रूपये २५.०० लाखापर्यंतच्या कामांकरिता तांत्रिक मंजूरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे घेण्याचे प्रस्तावित आहे. महसूल यंत्रणेकडे असलेला कामाचा व्याप पाहता, त्यांचेवर जास्त ताण पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बाबीचा विचार करता, वन विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कामांच्या अनुषंगाने, त्या यंत्रणेकडे अधिक व्यापक प्रमाणात तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालील निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

वन विभागातील अधिकाऱ्यांना वनविभागामार्फत करण्यात येणाऱ्या वनीकरण व रोपवाटिकांच्या कामासंबंधित तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीच्या आर्थिक मर्यादा खालीलप्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत :-

